International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# धुळे खजिना लुट : सांगली जिल्हयातील क्रांतीकारकांचे योगदान

**डॉ. अरूणा पाटील**
*असोसिएट प्रोफेसर*
*के. आर. पी. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर.*
*Corresponding Author - डॉ. अरूणा पाटील*
**DOI - 10.5281/zenodo.10939269**

भारताच्या स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासात 1942 चा लढा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता. या लढयाने स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासात एक वेगळा ठसा उमटवला आहे. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे अधिवेशन मुंबई येथे गोवालिया टँक मैदानावर भरले 8 ऑगस्ट 1942 रोजी सायंकाळी आखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीने ब्रिटीशांविरोधात छोडो भारत चा ठराव मंजूर केला. व ब्रिटीशांविरोधात उघड क्रांती जाहीर केली. म. गांधीनी आपल्या देशवाशियांना 'करा अथवा मरा' असा संदेश दिला.

'करेंगे या मरेंगे' या आरोळया देशभर उठल्या इंग्रजांना हिंदुस्थानातून हाकलून देण्याची सर्वांनी प्रतिज्ञाच केली. सातारा जिल्हा या बाबतीत आघाडीवर राहीला गांधीजी व इतर नेत्यांना 9 ऑगस्ट रोजी सकाळी पकडण्यात आले. ब्रिटीशांनी त्यांना कुठे ठेवले आहे याचा सुगावा भारतीयांना लागू दिला नाही. गांधीजी व इतर नेत्यांना पकडले ही बातमी ऐकून भारतीय लोक संतप्त झाले. सातारा इलाख्यातील कॉंग्रेस कार्येकर्ते एकत्रित आले. त्यांनी आप खुशीने आंदोलन करण्याचे व पोलिसांना चकवण्यासाठी भूमिगत व्हायचे ठरवले. कृष्णा वारणेच्या परिसरातून क्रांतीसिंह नाना पाटील, वसंतदादा पाटील, पांडू मास्तर, नागनाथ आण्णा, बर्डे, बाबूराव चरणकर, जी. डी. बापू, नागनाथ नायकवडी यांच्याबरोबर अनेक भूमिगतांनी सातारा जिल्हयात ब्रिटीशांविरोधात चळवळ उभी केली. संतप्त कार्यकर्त्यांनी गावोगावी प्रभातफेऱ्या काढल्या, सभा घेतल्या हरताळ पाळले, सरकारी इमारती जाळल्या यामुळे संपूर्ण जिल्हयात 1942 चा लढा उभा राहीला. ब्रिटीशांनी जनआंदोलन दडपून टाकण्याचे प्रयत्न केले.

क्रांतीसिंह नाना पाटील यांनी 9 ऑगस्ट 1942 रोजी कुंडल येथे 100 ते 150 कार्यक्रर्त्यांची सभा घेतली. तासगांव इस्लामपूर कचेरीवर मोर्चे काढले. सरकारने क्रांतीकारकांची धर पकड केली. त्यामुळे सावधपणे चळवळ चालवण्याचे ठरले 1 जून 1943 रोजी कामेरी येथे ऊसाच्या शेतात या बैठकीतील निर्णयातून प्रतिसरकार स्थापन झाले. या बैठकीतील निर्णयातून प्रतिसरकार स्थापन झाले

प्रतिसरकार मुख्यत: तीन भागात विभागिले गेले. 1) तुफानसेना 2) लोकराज्य 3) न्याय व्यवस्था

तुफानसेना हा सातारच्या प्रतिसरकारचा महत्त्वाचा घटक होता. दरोडेखोर, सावकार, सरकारचे खबरे, हस्तक व समाज कंटक यांना शह देण्यासाठी या सेनेची स्थापना कुंडल येथे करण्यात आली. नाना पाटील यांनी सेनेची जबाबदारी कुंडलेचे जी. डी. लाड यांच्यावर सोपवली. सांगली जिल्हयात कुंडल आणि वाळवा ही स्वातंत्र्य लढयाची प्रमुख दोन केंद्रे होती. स्वातंत्र्य आंदोलनासाठी पैशाची गरज होती. 1 जून 1943 रोजी प्रतिसरकारची स्थापना झाल्यावर हालचाली वाढल्या. न्यायालयीन आणि कार्यकारी कामे पार पाडण्यासाठी, सशस्त्र दले संघटित करून त्यांची देखभाल, शस्त्रास्त्रे यासाठी पैशाची गरज होती.

क्रांतिकारकांनी पैशासाठी लोकांवर कर लादले नाहीत. निधि गोळा करणे, घातपाती हालचाली फी व दंड वसूल करणे, राजकीय दरोडा यावर भर दिला. गोवा आणि कारवारमधून हत्यारे आणि दारूगोळा आणण्यासाठी खूप पैसा लागत होता. स्वातंत्र्यसैनिकांजवळ पैसे नव्हते त्यांची आर्थिक कोंडी झाली होती. क्रांतीकारकांनी सर्वंकष विचार करून निर्णय घेतला की, सरकारने लुटलेला पैसा हस्तगत करून इथल्या स्वातंत्र्य आंदोलनसाठी वापरायचा.

तत्कालिन औंध संस्थानातील आटपाडी हे स्वातंत्र्य चळवळीचे केंद्र होते. आटपाडी येथे खादी कार्यालय होते. या कार्यालयाचे व्यवस्थापक पश्चिम खानदेशामधील कापडणे गावचे होते. त्यांचे नाव धुडकू तानाजी ठाकरे होते. कापडण्याचे काँग्रेस कार्यकर्ते विष्णु सिताराम पाटील अटक टाळण्यासाठी ऑगस्ट 1943 मध्ये आटपाडी येथे ठाकरे यांच्याकडे आले. याशिवाय आणखी एक व्यक्ती म्हणजे शिरपूरचे शंकर पांडू माळी हेही ठाकरे यांच्याकडे राहण्यास आले. आटपाडीच्या मुक्कामात विष्णू पाटलांचा जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी ज्ञानू संतु उर्फे उस्ताद, नाथाजी लाड आणि इतर भुमिगत कर्त्यांशी संबंध आला हे सर्वजण सातारा आणि खानदेश जिल्हयातील राजकिय परिस्थिती संबंधी चर्चा करायचे सर्वांनाच पैशाची चणचण भासत होती. म्हणून त्यांनी धुळयाचा सरकारी खजिना लुटायचे ठरवले धुळे येथे कोणत्या मार्गाने जायचे हे सांगून विष्णू पाटील व शंकर माळी धुळयाला पुढे गेले.

खानदेशात जावून सरकारी खजिना लुटण्यासाठी शस्त्रात्रे हवी होती. धोंडिराम बापूंच्याकडे एक रिव्हॉल्व्हर होते कुरळप येथील स्वातंत्र्य सेनानी निवृत्ती काका पाटील यांच्या घरी नागनाथ आण्णा, जी. डी. लाड आणि धोंडिराम बापू माळी यांची भेट झाली त्यानंतर सांगली, कोल्हापूर, निपाणी लोंढा, कॅसलरॉक, पणजी असा प्रवास करत गणपतराव लाड व खानदेशी युवक गेले आणि रिव्हॉलव्हर, काडतुसे आणि दारूगोळा सावंतवाडी मार्गे आटपाडीत गुपचूप आणण्यात आले.

धुळे खजिना लुटण्यासाठी सांगली जिल्हयातून जी. डी. लाड, (कुंडल) वाळव्याचे नागनाथ नायकवडी, वाळव्याचे आप्पा गणू पाटील,

घोगावचे दत्तू जाधव, दहयारीचे ज्ञानू संतू जाधव उर्फे वस्ताद कुपवाडचे धोंडीराम माळी, घोगांवचे बाळा जोशी कवठेएकंदचे रावसाहेब कळके हे सर्व भूमिगत गटागटाने कुंडल ते धुळे हा साडेपाचशे-सहाशे किलोमीटरचा प्रवास करून धुळे येथे एप्रिल 1944 च्या पहिल्या आठवडयात धुळयात पोचले व तेथून पुढे वडजाईस पोहोचले ठरल्याप्रमाणे 12 भूमिगत धुळयाजवळील बागेत शंकर माळी यांच्यासह एकत्र आले.नंतर शंकर माळी यांनी त्या सर्वांना डांगरीच्या डॉ. उत्तमराव पाटील यांच्याकडे नेले. खजिना लुटण्यांचा बेत पक्का होईपर्यंत हे सर्व भूमिगत बोरकुंडच्या जंगलात, पांजर पोळच्या मळयात, धुळे स्टेशनच्या पलिकडे आप्पासाहेब रणदिव्यांच्या आमराईत रहात होते. या मुक्कामात रामचंद्र बाबा हे बोरकुंड, वडजाई, मोहाडी गावातून भाजी भाकरी गोळा करीत होते. भाकरी भूमिगतांना पोहोचवण्याचे काम डॉ. उत्तमराव पाटील व चिंधू सुखदेव करत होते. डॉ. उत्तमराव पाटील यांच्या विश्वासाची माणसे आसपासच्या गावात असल्याने क्रांतिकारकांना सर्व मदत होत होती.

धुळे जिल्हयाच्या हद्दीवर डोंगराळ भागात साक्री हे छोटेसे गाव वसले होते. तेथील सरकारी खजिन्यात दीड लाख रूपये आहेत. अशी माहिती मिळताच तो खजिना लुटण्याचा क्रांतिकारकांनी बेत आखला दरम्यान फकिरा आप्पा यांनी डॉ. उत्तमराव पाटील यांना दयाराम पाटलांकडून मिळालेला निरोप सांगितला तो असा, धुळयाहून - नंदूरबारला नेमाने मोठी रक्कम पाठविली जाते. हा निरोप मिळताच भूमिगतांनी आपला साक्री लुटीचा कार्यक्रम पुढे ढकलला यानंतर भूमिगतांनी आपला मुक्काम पांजरपोळ येथील जनावरांच्या गोठयात हलवला येथे धुळयाचा खजिना लुटण्याचा बेत पक्का झाला.सुरूवातीस चिमठाणा या छोटया शहरात खजिन्याची गाडी अडवून लुटायची असा बेत होता. कारण डोंगराळ भागातील त्या गावात एकच पोलीस ठाणे होते. शिवाय आजूबाजूच्या गावात कॉंग्रेसचे लोक होते. धुळयाचा खजिना कोणत्या तारखेला व वेळेला नंदूरबारला नेण्यात येणार आहे ही बातमी काढण्यासाठी विष्णू पाटील धुळयाला दयाराम पाटील यांच्याकडे पोलिस लाईनमध्ये मुक्कामास गेले. नंतर 12 एप्रिलला धुळयाला गेले, 14 एप्रिल 1944 रोजी सकाळी एका बसमधून पाच लाख एकावन्न हजार रूपयांचा खजिना धुळयातून नंदूरबारला जाणार असल्याची पक्की खबर डॉ. उत्तमराव उत्तमराव पाटील यांना दयाराम पाटील यांच्याकडून 13 एप्रिल रोजी मिळाली. त्यामुळे सर्वांना खूप आनंद झाला. त्यांनी पांजरपोळ येथे थांबलेल्या इतर भूमिगतांना ही बातमी दिली.

यानंतर भूमिगतांचे दोन गट करण्यात आले ओंकार बापूंनी दोन बैलगाडया पांजरपोळला पाठवल्या 14 एप्रिल रोजी पहाटे साधारण एक वाजता 11 भूमिगतांनी पांजरपोळ सोडले, दोन गाडयात बसून भूमिगत चालले होते. पहाटे साडेतीन वाजता धुळे येथील गोल चावडी पोलीस स्टेशन जवळ येताच वहाने जोरात पळवण्यात आली. तरीही गार्ड डयूटीवरील पोलिसाने पाठलाग करून गाडया अडवल्या भूमिगतांनी पोलिसाला चांगलाच धडा शिकवला. आप्पा गणूंजी पाटील नी त्यांची

शिटी काढून घेतली. नागनाथ आण्णांनी त्याला उचलुन खाली आपटले. जी. डी. लाड यांनी आपल्या रूमालाचा बोळा त्यांच्या तोंडात कोंबला व पुलाच्या दुसऱ्या टोकाला फरफटत नेले. यांनतर पोलीस नरम आला. आमचा विश्वासघात करू नकोस अशी ताकीद देवून त्याला सोडले. हे सर्व होईपर्यंत पहाटेचे पाच वाजले होते. चिमठाण्याला पोहचण्यास उशीर होता. अजूनही 22 मैल दूर होता. दरम्यान डॉ. उत्तमराव पाटलांनी आपल्या तेथील सहकाऱ्यांच्या मदतीने एक टॅक्सी 35 रूपयाला ठरवली. पाच भूमिगतांसह टॅक्सीने प्रवास केला. चिमठाण्याचा डाक बंगला एक फर्लांगवर असताना डॉ. उत्तमराव पाटील यांनी कामाचे निमित्त करून सर्वांना खाली उतवले. चिमठाण्याऐवजी तेथून दोन सव्वादोन किलोमीटर अंतरावर असलेल्या साळवे गावच्या हद्दीत एका चढावर गाडी लुटावी असे ठरले.

चढावर गाडीचा वेग स्वाभाविकपणे कमी होणार तसेच भोवताली जंगलही होते. लूट केल्यानंतर जंगलातही प्रसार होणे सोपे होणार होते. आठ भूमिगतांचे दोन गट केले. पहिल्या गटात जी. डी. लाड किसन मास्तर, शंकर माळी, आणि नागन्नाथ आण्णा होते. या गटाने दोन मैल अंतर चालत जावून खजिना घेवून येणारी गाडी चढावर थांबवण्यासाठी लुटुपूटूची मारामारी करायची दुसऱ्या गटात धोंडीराम माळी, रावसाहेब कळके, आप्पा गणू पाटील व डॉ. उत्तमराव पाटील यांचा समावेश होता या गटाने चिमठाण्यापासून खजिन्याच्या गाडीतून प्रवास करायचा होता.

इंपिरियल बँक ऑफ इंडियाच्या धुळे शाखेतून घेतलेल्या साडेपाच लाख रूपयांच्या नोटा आणि एक हजार रूपयांची नाणी आठ पेंटयामध्ये ठेवली. आठ पेटया बंद करून हेड कॉन्स्टेबल सयाजी किंवा बक्कल नंबर 703 आणि कॉन्स्टेबल सदाशिव भास्कर बक्कल नंबर 1188 यांच्या ताब्यात दिला या खजिन्याचे धुळे ते नंदुरबार संरक्षण करण्याचा आदेश अंमलदाराने दिला.

खजिना नेण्यासाठी रामदास वाणी यांनी बस नंबर बी. वाय. पी. 422 ही भाडयाने आणली. सेकंड क्लास कंपार्टमेंट मध्ये पैशाच्या पेटया ठेवल्या. यानंतर 14 एप्रिल 1944 रोजी ही बस बँकेच्या इमारतीपासून मोटार स्टँडवर नेण्यात आली. या ठिकाणी काही प्रवासी बसले. सकाळी साडेदहा वाजता खजिना बस धुळे मोटार स्टँडवरून निघाली आणि साडे आकराच्या सुमारास चिमठाणा मोटार स्टँडवर पोहोचली. चिमठाण्याच्या बसस्थानाकावर प्रचंड गर्दी होती. डॉ. उत्तमराव पाटील यांनी एका पोलीसाला विंनती केली मला मालपूर येथे तीन सहकाऱ्यानिशी पुतणीच्या लग्नाला जायचे आहे. हे पटवून सांगितले. चहा दिला त्या पोलीसाला सिगारेटचे भरलेले पाकीट व दहा रूपये दिले. या बदल्यात मोटार स्टँडवर येणाऱ्या कोणत्याही बस मध्ये चौघांना जागा देण्यात येईल असे पोलीसांने आश्वासन दिले. तिघेजण बसमध्ये बसले व एकजण ट्रकवर नियोजित जागेवर गेले.

खजिन्याच्या गाडीमध्ये रावसाहेब कळके, धोंडीराम माळी आणि आप्पा गणू पाटील असे तिघे

होते चढावरील लुटूपुटूची मारामारी दिसावी यासाठी आप्पा गणू पाटील ओकण्याचे निमित्त करून वारंवार आपले डोके बसच्या बाहेर काढत होते. असा प्रयत्न करीत असताना त्यांना चढावर ती खोटी मारामारी चालू असलेली दिसली. या बसने आम्हीच येत आहोत ही खूण पटावी म्हणून त्यांनी खिडकीबाहेर हात काढून हवेत रूमाल फडकावला, व इतरांना सावध राहण्याची खूण केली

ठरल्याप्रमाणे चढावर जी.डी. लाड, नागनाथ आण्णा हे इतर दोघांबरोबर रस्त्याच्या मध्यभागी खोटी मारामारी करत होते. बसच्या चालकाने मारामारी पाहीली आणि तो 'बाजूला व्हा 'असे म्हणून त्यांच्यावर ओरडला. पण ते बाजूला झाले नाहीत. याचवेळी धोंडीराम बापूंनी रिव्हॉल्व्हर बाहेर काढले आणि हवेत दोन गोळया झाडून चालकाला बस थांबवण्याचा आदेश दिला मात्र त्याने दुर्लक्ष करून वेग वाढवला तेव्हा धोंडीराम बापूंनी चालाकाच्या मानेवरच गोळी झाडली त्याचवेळी चालकाच्या खिडकीजवळ येवून नागनाथ आण्णानी त्याच्या हातावर दोन गोळया झाडल्या त्यामुळे चालकाचा बसवरील ताबा सुटला बस सेकंड गिअरमध्ये असल्यामुळे आपोआपच थांबली.

हेड कॉन्स्टेबल आणि कॉन्स्टेबल खजिन्याच्या पेटयांवर ठेवलेल्या बंदुका उचलणार एवढयात धोंडीराम बापूंनी हेडकॉन्स्टेबलच्या पाठीत गोळी मारली ती गोळी त्याच्या छातीतून निघून बाहेर पडली. त्यांनी झाडलेली दुसरी गोळी बसच्या लोखंडी बारवर आदळली आणि कळके यांच्या हातात घुसली. दरम्यान रस्त्यावर खोटी मारामारी करणारे चौघे भूमिगत बसमध्ये आले ट्रकने आलेले उत्तमराव पाटील ही त्यांना येवून मिळाले. बसमधील प्रवासी गोळीबाराने भयभयीत झाले होते. पोलिसांच्या बंदुका, संगिनी काडतुसांचे पट्टे क्रांतीकारकांनी ताब्यात घेतले सर्व प्रवाशी, पोलीस, ड्रायव्हर यांना खाली उतरवून जवळ असलेल्या लिंबाच्या झाडाखाली बसवण्यात आले. कोणीही आपल्या जागेवरून हलायचे नाही किंवा वर पाहायचे नाही अशी ताकीद देण्यात आली. आप्पा गणू पाटील आणि शंकर माळी हे दोघे हातात पिस्तुल घेवून या सर्वांवर पाळत ठेवत होते.

बसमधील पाच भूमिगतांनी पैसे असलेल्या आठ पेट्या खाली रस्त्यावर आणल्या. भूमिगतांनी सर्व पेटया उघडून त्यातून नोटांच्या थप्प्या वर काढल्या. आठ भूमिगतांपैकी चौघांनी खाकी पँटवर नेसलेली धोतरे सोडली आणि त्यात नोटा बांधल्या. काहींनी नाणी रस्त्यावर उधळल्या आणि लिंबाच्या झाडाखाली बसलेल्या प्रवाशांना 'तुम्ही घेऊन जा' असे सांगितले नोटांची चार गाठोडी उचलत असताना 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा सर्व भूमिगतांनी दिल्या आणि ते पश्चिमेकडे निघून गेले. जाण्यापूर्वी बसचा मागचा टायर व थांबलेल्या ट्रकचा पुढचा टायर पोलिसांच्या बंदुकीतून दोन गोळया मारून पंक्चर केला. हा सर्व कारभार वीस मिनिटांत पार पडला. क्रांतिकारकांचा त्यानंतरचा प्रवास फार खडतर झाला.

धुळयाचे रावसाहेब अंकसरैचा नावाचे डी.वाय.एस.पी. यांना खजिना लुटल्याची बातमी

कळताच ते स्वत: घटनास्थळी गेले आणि दळवी नावाच्या फौजदाराला भूमिगतांचा पाठलाग करण्यास पाठवले.

पोलिसांना चुकवण्यासाठी भूमिगतांनी जंगलाकडे धूम ठोकली. वाटेत त्यांना भगवान नावाचा भिल्ल जातीचा मुलगा भेटला त्याने तीन चार मैल आपल्या खांद्यावर नोटांचे एक गाठोडे वाहून नेले. तहान लागले म्हणून हे सर्वजण एका विहिरवर थांबले नोटांच्या गाठोडयाची राखण करण्यास त्या मुलाला सांगून विहिरीत उतरले. भगवानला संशय आल्याने नोटांची सर्व गाठोडी तेथेच टाकून दहा हजार रूपयांच्या नोटा घेवून तो पळून गेला. भगवान पळून गेल्याने भूमिगतांनी रातोरात नाशिक जिल्हयात जाण्यासाठी निघाले.

सर्व भूमिगत मंडळी थकून गेले होते. ते एका टेकडीच्या पायथ्याशी विश्रांतीसाठी थांबले. डॉ. उत्तमराव पाटील स्वत: पहाराकरित होते. दरम्यान भगवानने या भूमिगतांची खबर पोलीसांना दिली. पोलीस पायांच्या ठशांचा माग काढीत शेवडेच्या जंगलात गेले. पोलीसांना पाहताच सर्वजण नोटांची गाठोडी घेवून पळत सुटले. पोलीसांनी नऊ फर्लांग भूमिगतांचा पाठलाग केला, गोळीबार सुरू केला. भूमिगतांनी ही जशास तसे उत्तर दिले. शेवटी अंधार पाठल्याने गोळीबार थांबला याचा फायदा घेऊन भूमिगत जंगलात पसार झाले. पोलीसांनी अकरा गोळया झाडल्या. जी. डी. लाड यांच्या पिंडरीत गोळी लागली होती आणि नागनाथ नायकवडी यांच्या खांद्यावर गोळीने खरचटले होते. जंगलात भूमिगतांनी नोटांच्या चार गाठोडयांची दोन गाठोडी केली आणि आपले दोन गट केले. पहिल्या गटात शंकर माळी, नागनाथ नायकवडी, रावसाहेब कळके व आण्णा गणू पाटील यांचा समावेश होता. दुसऱ्या गटात उत्तमराव पाटील, जी. डी. लाड, किसन मास्तर व धोंडीराम माळी यांचा समावेश होता. शनिवार 15 एप्रिल रोजी उत्तमराव पाटील व जी. डी. लाड इतर दोघांसह खोप्रेला पोचले. तेथे त्यांनी केशव नाथू यांची भेट घेतली. बैलगाडी ठरवून देऊर येथे मेनकाबाई यांच्या घरी गेले. तेथून ते बैलगाडीने प्रवास करत बोरकुंडला ओंकार बापूंकडे गेले.

दुसऱ्या गटात शंकर माळी, नागनाथ नायकवडी, रावसाहेब कळके आणि आण्णा गणू पाटील होते ते मेहेर गावला पोहोचले रस्त्यालगत एका शेतात त्यांनी नोटांचे गाठोडे पुरले आणि तळेगाव व नंतर नंदगावला गेले. तेथे नाथाजी लाड आणि राजमती पाटील ऊर्फ ताई यांच्याबरोबर त्यांची भेट झाली. तेथे ते दोघे आपल्या सहकाऱ्यांनी मिळवलेली लूट नेण्यासाठी आले होते. अखेरीस 15 एप्रिल रोजी ते बोरकुंडला पोहोचले. दोन्ही ही गट 16 एप्रिलला दुपारी ओंकारबापूंच्या घरी भेटले आणि त्यांनी एकमेकांची चौकशी केली. नागनाथ नायकवडी आणि रावसाहेब कळके, मेहर गावाला परत गेले आणि शेतात पुरलेल्या नोटांचे गाठोडे बैलगाडीतून आणले. नंदगावाजवळ टरबुजे खरेदी केली आणि त्यात नोटांचे गाठोडे लपवले.

16 एप्रिल रोजी पहाटे डॉ. उत्तमराव पाटील यांच्या नातेवाईकांकडे गेले. उत्तमराव

पाटील व विष्णू पाटील यांनी खानदेशाकरिता एक लाख रूपये ठेवून घेतले उर्वरित रक्कम सातारच्या क्रांतिकारकांना दिली. खूप हालअपेष्टा सहन करित व कष्ट घेवून सगळे क्रांतिकारक परतले. खानदेश आणि सातारा जिल्हयातील लढ्यासाठी लुटीतील पैशा वापरला गेला.

या लुटीतील सव्वा लाख रूपये हिंदुस्तान चळवळीसाठी अच्युतराव पटवर्धन यांच्याकडे दिले. एक लाख खानदेश दिले. इतर खर्च वगळता जिल्हयात दोन लाखाच्या वर रक्कम आली. राजूताई पाटील यांनी मोठी जोखीम पत्करून ही रक्कम जिल्हयात आणली. काही रक्कम ज्या शेतात पुरून ठेवली होती. तेथेच राहिली होती.

चिमठाणा खजिना लुटीत सांगली जिल्हयातील कुपवाडचे धोंडीराम माळी, वाळव्याचे नागनाथ नायकवडी, साखराळेचे आप्पा पाटील, कुंडलचे गणपतराव लाड, कवठे एकंदचे निवृत्ती कळके ही मंडळी प्रत्यक्ष लुटीत होते. याशिवाय खानदेशातील शंकर माळी, व्यंकट धोबी, डॉ. उत्तमराव पाटील ही प्रमुख मंडळी होती. प्रत्यक्ष लुटीत शंकर माळी व डॉ. उत्तमराव पाटीलच होते. सरकारने धुळयाच्या न्यायालयात सात जणां विरूध्द खटला दाखल केला. त्यामध्ये धोंडीराम बापू माळी, व्यंकटराव धोबी आणि शंकर माळी अशा तिघांना जन्म ठेपेच्या शिक्षा झाल्या. मात्र 1946 मध्ये सत्तेवर आलेल्या काँग्रेस सरकारने ती शिक्षा माफ केली. डॉ. उत्तमराव पाटील यांना पोलीसांनी पकडले. परंतु पंढरपूर मधूनच त्यांनी आपली सुटका करून घेतली व कुंडल ग्रुपमध्ये सहभागी झाले.

सांगली जिल्हयातील क्रांतिकारांनी बलाढय ब्रिटीश सत्तेचा साडेपाच लाख रुपयांचा खजिना दिवसा ढवळया लुटून ब्रिटीश सत्तेला सणसणीत चपराक लगावली. भारतीय स्वातंत्र्य लढयाला फार मोठा हातभार लावला. धुळे खनिजा लुटीने प्रतिसरकारचा देशभर दरारा निर्माण झाला .एका अर्थाने भारतीय स्वातंत्र्य लढयातील सोनेरी पान लिहिले गेले एकंदर भारतीय स्वातंत्र्यासाठी या क्रांतीकारकांनी जीवनातील सर्वोच्च त्याग केला होता. आपल्या घरादारावर तुळशीपत्रे ठेवली होती. खानदेशातील या धुळे खनिजा लुटीत सांगली जिल्हयातील क्रांतीकारकांचे जेवढे योगदान आहे तेवढेच योगदान धुळे नंदुरबार जिल्हयातील क्रांतीकारकांचे आहे. स्वातंत्र्याला 75 वर्षे झाली आपण सर्वांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. या क्रांतीकारकांची देशभक्ती त्यांनी क्रांतीकार्यासाठी दिलेले योगदान भावी पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

**संदर्भ**


1. डॉ. पवार जयसिंगराव, क्रांतिसिंह नाना पाटील, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर २००३, पृ. ७३
2. लाड जी.डी., "पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य'' भारती विदयापीठ, पुणे, १९८६
3. प्रा. पाटील विलास, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवैभव प्रकाशन, हणमंतवडिये, १९९२, पृ. ११५

4. लोहार दत्तात्रय बळवंत, स्वातंत्र्याचा संग्राम, संगम प्रिटींग प्रेस, सांगली, १९८२, पान नं. १२५
5. प्राचार्य डॉ. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार, उषा प्रकाशन, कोल्हापूर, पान नं. २९५
6. सहस्त्रबुध्दे चिंतामणी, इतिहासाची सुवर्ण पाने, आदित्य प्रकाशन सांगली २०१३, पृ. ४८
7. श्री. गोखले पुरुषोत्तम पांडूरंग, जागृत सातारा, लोकसेवासंघ सातारा, १९६६, पृ.१९६